असा. क्र. ५२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३/०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, नोव्हेंबर २५, २००४ / अग्रहायण ४, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

## अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३४.**–फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. ४४९-४५१

## गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ नोव्हेंबर २००४.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XXXIV OF 2004.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३४.

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १६७ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींअन्वये, अटक केलेल्या आणि तपास पूर्ण होईपर्यंत, चोवीस तासांपेक्षा अधिक काळ कोठडीत ठेवण्यात आलेल्या आरोपी व्यक्तीस, कोठडीतील आरोपी व्यक्तीची स्थानबद्धता प्राधिकृत करण्याची अधिकारिता असणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे लागते ;



[**किंमत** : रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** एकतर पोट-कलम (२) किंवा त्याचे परतुक यानुसार अभिप्रेत असल्याप्रमाणे कोठडीत ठेवण्याच्या मुदतीत वाढ मिळविण्यासाठी आरोपी व्यक्तींना राज्यातील निरनिराळ्या मध्यवर्ती तुरूंगामधून किंवा जिल्हा तुरूंगांमधून संबंधित न्यायालयांकडे नेताना आणि तेथून परत आणताना संरक्षक म्हणून सोबत करण्यासाठी फार मोठ्या संख्येतील पोलिसांच्या सेवा घ्याव्या लागतात ;

**आणि ज्याअर्थी,** या प्रयोजनासाठी पोलिसांची मोठ्या प्रमाणात नियुक्ती करूनदेखील, न्यायालयात दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावयाच्या आरोपी व्यक्तींच्या संख्येत सतत वाढ होत असल्यामुळे अनेक कैदी, तुरूंगात ठेवण्याच्या मुदतीत आणखी वाढ मिळविण्यासाठी दंडाधिकाऱ्यासमोर हजर न केले जाता तुरूंगातच राहतात ;

**आणि ज्याअर्थी,** यामुळे पोलीस विभागाच्या दैनंदिन प्रशासनाच्या कामात गैरसोय आणि विस्कळीतपणा देखील निर्माण होतो ;

**आणि ज्याअर्थी,** पोलीस कोठडीमध्ये असलेल्यांहून अन्य आरोपी व्यक्तींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याच्या मुदतीत वाढ मिळविण्याच्या प्रयोजनासाठी, इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत संबंधित दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करणे हाच, ही सततची समस्या सोडविण्यासाठी प्रभावी पर्याय असल्याचे ठरविण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ; १९७४ चा २

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) च्या परंतुकाअन्वये राष्ट्रपतींचे अनुदेश मिळविण्यात आले आहेत ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :--

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, २००४ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९७४ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १६७ ची सुधारणा.

**२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ हा अधिनियम महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १६७ मध्ये,-- १९७४ चा २.

(क) पोट-कलम (२) मध्ये, परंतुकामधील परिच्छेद (ख) ऐवजी पुढील परिच्छेद दाखल करण्यात येईल :--

" (ख) कोणताही दंडाधिकारी, आरोपी व्यक्तीची कोणत्याही कोठडीतील स्थानबद्धता, अशा व्यक्तीला त्याच्यासमोर प्रत्यक्ष हजर केल्याशिवाय, या कलमाखाली प्राधिकृत करणार नाही आणि पोलीस कोठडीशिवाय अन्य कोणत्याही कोठडीत ठेवण्याच्या मुदतीत वाढ मिळविण्याकरिता त्या आरोपी व्यक्तीला एकतर प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत हजर करता येईल. ";

(ख) स्पष्टीकरण दोन मध्ये, " आरोपी व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले होते " या मजकुराऐवजी " आरोपी व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा यथास्थिति, इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत, दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले होते " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

# निवेदन.

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ५७ अन्वये कोणताही पोलीस अधिकारी, वॉरंटशिवाय अटक केलेल्या एखाद्या व्यक्तीला, संहितेच्या कलम १६७ अन्वये दंडाधिकाऱ्याचा विशेष आदेश असल्याखेरीज, २४ तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी कोठडीत स्थानबद्ध करून ठेवणार नाही. कलम १६७ (१) अनुसार, एखाद्या व्यक्तीला अटक केलेली असेल आणि अन्वेषण पूर्ण होईपर्यंत कलम ५७ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे २४ तासांपेक्षा अधिक काळ तिला कोठडीत स्थानबद्ध करून ठेवण्याची आवश्यकता असेल तेव्हा, अशी स्थानबद्धता प्राधिकृत करण्यासाठी, अशा आरोपी व्यक्तीला सर्वात नजीकच्या न्याय दंडाधिकाऱ्यासमोर हजर करणे आवश्यक असते. याच्या परिणामी, पोलीस विभागावर प्रचंड ताण पडतो. तसेच, राज्यातील विविध तुरुंगांमध्ये स्थानबद्ध केलेल्या आरोपी व्यक्तींना संबंधित न्यायालयांमध्ये नेताना व तेथून परत आणताना संरक्षक म्हणून सोबत करण्यासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणात पोलिसांच्या सेवांचा वापर करण्यात येतो. दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावयाच्या आरोपी व्यक्तींच्या संख्येत झालेल्या सततच्या व भरमसाठ वाढीचा परिणाम म्हणून, कधी कधी या कामासाठी अशी बहुसंख्येने पोलिसांची नेमणूक केली असतानाही, अनेक कैद्यांना विनिर्दिष्ट कालावधीत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्याचे राहून जाते, आणि याची परिणती, न्यायालयाने संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निदेश देण्यात होते. पोलीस विभागाची नियमित कर्तव्ये व प्रशासन यांची अत्यंत गैरसोय होण्यात व त्यात विस्कळीतपणा येण्यातही याचा परिणाम होतो. म्हणून, न्यायालयात ज्यांच्याविरुद्ध पुरावा नोंदला जात आहे असे आणि जे पोलीस कोठडीत असतील असे आरोपी वगळून, विविध कारागृहांमध्ये स्थानबद्ध केलेल्या आरोपी व्यक्तींना, तेथे ठेवण्याच्या मुदतीत वाढ करण्याच्या प्रयोजनांसाठी संबंधित दंडाधिकाऱ्यासमोर, इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत हजर करता येण्याची परवानगी देणे व त्यासाठी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्याला लागू असताना, त्याच्या विद्यमान कलम १६७ मध्ये यथोचित सुधारणा करणे आवश्यक आहे असे महाराष्ट्र शासनाला वाटते. यामुळे, तुरुंगात ठेवण्यात आलेले कैदी, त्यांची ने-आण करताना निसटून जाण्याची जोखीमही कमी होईल आणि इतर कर्तव्ये बजावण्याकरिता पोलीस कर्मचारीवर्गाचा वापर करणेदेखील सुकर होईल.

२. दिनांक २४ मे २००४ रोजी सुरू झालेल्या राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये, दिनांक २८ मे २००४ रोजी महाराष्ट्र विधानसभेत फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५) हे विधेयक मांडण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभेमध्ये या विधेयकावर विचार केला जाण्यापूर्वीच दिनांक ११ जून २००४ रोजी राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची सत्रसमाप्ती झाली. पोलीस कोठडीतील आरोपी व्यक्तींव्यतिरिक्त अन्य आरोपी व्यक्तींना व्हिडिओ संपर्क यंत्रणेमार्फत संबंधित दंडाधिकाऱ्यासमोर तात्काळ हजर केले गेले पाहिजे, असे शासनास वाटत असल्यामुळे, अध्यादेश प्रख्यापित करून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात योग्य त्या सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उक्त संहिता महाराष्ट्र राज्यास लागू असताना, उपरोक्त प्रयोजनांसाठी तीमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २५ नोव्हेंबर २००४.

**मोहम्मद फजल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. कु. दौ. जाधव,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ७६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरुवार, नोव्हेंबर २५, २००४/अग्रहायण ४, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Consitution of India, the following translation in English of the Code of Criminal Procedure (Maharashtra Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. XXXIV of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Code of Criminal Procedure (Maharashtra Amendment) Ordinance, 2004 (Mah. Ord. XXXIV of 2004) published under the authority of the Governor.]

---

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 25th November 2004.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XXXIV OF 2004.

*AN ORDINANCE*

*further to amend the Code of Criminal Procedure, 1973, in its application to the State of Maharashtra.*

2 of 1974. WHEREAS under the provisions of sub-section (*2*) of section 167 of the Code of Criminal Procedure, 1973 an accused person arrested and detained in custody pending completion of investigation, beyond twenty-four hours, has to be produced before the Magistrate having the jurisdiction for authorising the detention of the accused person in custody;

AND WHEREAS for any extension of custody either as envisaged by sub-section *(2)* or under the proviso thereto, the services of a very large number of policemen are required to be utilised for escorting the accused persons from various Central Jails, District Jails in the State to the respective Courts and back ;



[ किंमत : रुपये ४-०० ]

AND WHEREAS inspite of deploying such large number of policemen for the purpose, due to constant increase in the number of such accused persons required to be produced in the Courts before the Magistrates, many prisoners remain in the Jails without being-produced before the Magistrates for further extention of remand in Jail ;

AND WHEREAS it is also causing much inconvenience and dislocation of the work in the routine administration of the police department ;

AND WHEREAS it has been decided that production of the accused persons, otherwise than those in the police custody, through the medium of electronic video linkage, before the respective Magistrates for the purposes of extension of judicial remand would be an effective alternative for solving the said incessant problem ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Code of Criminal Procedure, 2 of 1973, in its application to the State of Maharashtra, for the purpose 1974. hereinafter appearing ;

AND WHEREAS the instructions of the President of India under of the proviso to clause (1) of Article 213 of the Constitution of India have been obtained ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of Article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

**1.** *Short title and Commencement.*—(*1*) This Ordinance may be called the Code of Criminal Procedure (Maharashtra Amendment) Ordinance, 2004.

*(2)* It shall come into force at once.

**2.** *Amendment of section 167 of Act 2 of 1974.*—In section 167 2 of of the Code of Criminal Procedure, 1973, in its application to the 1974. State of Maharashtra,—

(*a*) in sub-section *(2)*, in the proviso, for paragraph (*b*), the following paragraph shall be substituted, namely :—

" (*b*) no Magistrate shall authorise detention in any custody, of the accused person under this section unless, the accused person is produced before him in person, and for any extension of custody otherwise than the extension in the police custody, the accused person may be produced either in person or through the medium of electronic video linkage." ;

*(b)* in *Explanation II,* for the words " an accused person was produced " the words " an accused person was produced in person, or as the case may be, through the medium of electronic video linkage" shall be substituted.

# STATEMENT

Under section 57 of the Criminal Procedure Code, 1973 no Police Officer shall detain in custody a person arrested without a warrant, for a period exceeding 24 hours without a special order of a Magistrate under section 167 of the Code. Under section 167 *(1)*, whenever any person is arrested and required to be detained in custody, pending completion of investigation, beyond 24 hours as provided under section 57, such accused person is required to be produced before the nearest Judicial Magistrate for authorising such detention. This is resulting in great strain on the police department and utilisation of the services of a very large number of the policemen for escorting the accused persons detained in various Jails in the State to the respective Courts and back. Sometimes inspite of deploying such large number of policemen for this duty, as a result of constant and substantial increase in the number of accused persons being required to be produced before the Magistrates, many prisoners remain to be produced before the Magistrates within the specified period, resulting into Courts directing to take disciplinary action against the concerned police personnel. This is also resulting in much inconvenience and dislocation of the regular duties and administration of the police department. It has, therefore, been decided by the Government of Maharashtra that the production of accused persons, detained in various Jails other than those against whom evidence is being recorded in Courts, and those who are not in the police custody, for the purposes of subsequent remand extention through the medium of electronic video linkage before the respective Magistrates should be permitted by suitably amending the existing section 167 of the Criminal Procedure Code, 1973 in its application to the State of Maharashtra. This would also minimise the risk of escape of the remand prisoners during the transit and shall also facilitate utilisation of the police personnel for other duties.

2. In the Budget Session of the State Legislature which had commenced on the 24th May 2004, the Code of Criminal Procedure (Maharashtra Second Amendment) Bill, 2004 (L. A. Bill No. XV of 2004), was introduced in the Maharashtra Legislative Assembly on the 28th May 2004. However, before the Bill came for consideration in the Maharashtra Legislative Assembly the session of the State Legislature came to be prorogued on the 11th June 2004. As the Government feel that the production of accused persons, otherwise than those in the police custody, through the medium of electronic

video linkage before the concerned Magistrate should immediately be made, it is expedient, to amend the Code of Criminal Procedure, 1973, in its application to State of Maharashtra, suitable, by promulgating an Ordinance.

As both the Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the said Code, in its application to the State of Maharashtra, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 25th November 2004.

MOHD. FAZAL,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. K. D. JADHAV,
Additional Chief Secretary to Government

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई